मराठवाडा विद्यापीठ

संदर्भ क्र./संलग्न/नविन/८४-८५/ [illegible] दिनांक १३-२-१९८५.

सचिव,
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय, विस्तार-भवन,
मुंबई- ३२.

विषय :- जून १९८५ पासून (शैक्षणिक वर्ष १९८५-८६) नविन महाविद्यालये सुरु करण्यासाठी विद्यापीठ कायदा १९७४ कलम ४३ (४) अन्वये शासनाच्या पूर्वपरवानगी बाबत.

महोदय,

अध्यक्ष/सचिव - इंदिरा शिक्षण प्रसारक मंडळ, पारोदा ता. उदगीर जि. लातूर यांनी जून १९८५ पासून (शैक्षणिक वर्ष १९८५-८६) - उदगीर - येथे नवीन - शारीरिक शिक्षण - महाविद्यालय सुरु करण्यासाठी संलग्नीकरण शुल्क रुपये पाच हजारसह विद्यापीठास प्रस्ताव पाठविला आहे. सदरहू प्रस्तावावर कार्यकारिणीच्या दिनांक २९-१-१९८५ च्या बैठकीत विचार होऊन या नवीन महाविद्यालयास शासनाच्या पूर्वपरवानगीसाठी शिफारस करावी असा निर्णय घेण्यात आला.

सबब या पत्रासोबत संस्थेकडून प्राप्त झालेल्या विहित नमुन्यातील अर्जाची एक प्रत व नवीन महाविद्यालयाच्या माहितीसंबंधीचा एक तक्ता देण्यात येऊन आपणास विनंती करण्यात येते की, शासनाच्या पूर्वपरवानगीबाबत विद्यापीठास कळविण्यात यावे.

आपला विश्वासू,
सही/-
कुलसचिव

सोबत (वरील प्रमाणे)

या पत्राची एक प्रत माहितीसाठी अध्यक्ष/सचिव - इंदिरा शिक्षण प्रसारक मंडळ, पारोदा ता. उदगीर जि. लातूर यांना अग्रेषित करण्यात येते.

...llege of Physical Education
UDGIR Dist. Latur